Gurukul International Multidisciplinary Research Journal (GIMRJ)*with* International Impact Factor 8.357
Peer Reviewed Journal
https://doi.org/10.69758/GIMRJ/2507S01V13P011

e-ISSN No. 2394-8426
Special Issue on Scientific Research July'25
Issue–VII(I), Volume–XIII

# अस्पृश्यता आणि भारतीय संविधान

**प्रकाश मोतीराम मेश्राम***
पीएच.डी.विद्यार्थी (समाजशास्त्र विभाग)
–prakashmeshram109@gmail.com

**प्रा. डॉ. अशोक ता. बोरकर****
समाजशास्त्र विभाग प्रमुख
रा.तु.म.नागपूर, विद्यापीठ, नागपूर

**सारांश** – हजारो वर्षापासून अस्तित्वात असलेल्या अस्पृश्यतेच्या अमानवीय प्रथेने भारतीय समाजातील करोडो लोकांचे जीवन दु:खी– कष्टी झालेले आहे. या प्रथेच्याद्वारे सामाजिक विषमता निर्माण झाली आहे. मोठ्या प्रमाणात भेदभाव दर्शविल्या जाते. आणि मानवी हक्कांचं उल्लंघन होते. म्हणून भारतीय संविधानातील अनुच्छेद १७ अंतर्गत अस्पृश्यतेचा पूर्णत: निषेध केला आहे. अनुच्छेद १५ अन्वये कोणत्याही प्रकारच्या भेदभावास मनाई करण्यात आली आहे. अनुच्छेद ४६ द्वारे दूर्बल घटकांचे संरक्षण करण्यात आले आहे. अनेक अनुच्छेदान्वये संरक्षण देण्याचे काम करण्यात आले आहे. याबरोबरच 'अनुसुचित जाती – जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्या' द्वारे राज्याने प्रभावी उपाययोजना केलेल्या आहेत.

प्रस्तुत शोधनिबंधात अस्पृश्यतेची ऐतिहासिक पार्श्वभूमी, तीचे समाजावर झालेले परिणाम, त्यावरील संवैधानिक करावयाची उपाययोजना तसेच अजूनही अस्तित्वात असलेल्या समस्यांचा अभ्यास करण्यात आला आहे. यामध्ये कायदा, समाजशास्त्र आणि मानवाधिकार दृष्टीकोणातून विश्लेषण करण्यात आलेले आहे. अंतत: केवल कायदे करून चालत नाही. तर त्याबाबत सामाजिक दृष्ट्या जाणीव, तसेच शिक्षण आणि कायद्याची सक्रिय अंमलबजावणी फार आवश्यक आहे.

**मुख्य बिंदू** – अस्पृश्यता, संविधान, कायदे, अस्पृश्यता निर्मूलन.

**प्रस्तावना** – भारतीय समाज हा विविध जाती, धर्म, पंथ, संप्रदाय, भाषा आणि संस्कृती यांनी नटलेला आहे. थोडक्यात विविधतेने नटलेला आहे. मात्र या विविधतेमध्ये काही सामाजिक कुप्रथा सुद्धा आहेत. त्या खोलवर रूजलेल्या आहेत. त्यामध्ये अस्पृश्यता ही अत्यंत अमानवीय तसेच अन्यायकारक असलेली प्रथा होय. ती प्राचिन काळापासून शुद्र आणि अतिशुद्र (अनुसूचित जाती) यांच्यावर लादल्या गेलेली एक सामाजिक बहिष्काराची पद्धत होय. ज्यामुळे करोडो लोक अनेक मानवी अधिकारांपासून जसे सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक आणि धार्मिक दृष्टया वंचित राहिले आहेत.

स्वातंत्र्यापूर्वी अस्पृश्यतेच्या विरोधात अनेक संत, महात्मे, समाजसुधारक यांनी संघर्ष केला. पुढे स्वातंत्र्यानंतर अस्तित्वात आलेल्या भारतीय संविधानाने या प्रथेला पूर्णत: नाकारले. स्वातंत्र्य, समता, बंधुत्व आणि न्यायाला स्विकारून संविधानाने सर्वांनाच मानवीय अधिकार बहाल केले. संविधानातील अनुच्छेद १७ अन्वये अस्पृश्यतेला कायद्याच्या आधारे निषिद्ध ठरविले आहे.

प्रस्तुत शोधनिबंधात अस्पृश्यतेच्या अनुषंगाने तिची ऐतिहासिक पार्श्वभूमी, तिचे समाजावर झालेले परिणाम, भारतीय संविधानात केलेल्या तरतुदी तसेच वर्तमानातील या वाईट प्रथेचे अस्तित्व या बाबींचा समग्र अभ्यास केल्या जाणार आहे. संविधानात तरतुदी असतांनाही काही ठिकाणी अस्पृश्यतेचे स्वरूप आढळून येते. याच कारणाने या विषयाचे महत्व अधिकच दिसून येते. प्रस्तुत अभ्यासाचा उद्देश असा की याद्वारे सामाजिक समतेच्या दिशेने ठोस विचार करणे, कृती करणे आणि जनजागृती घडवून आणणे होय.

**अध्ययनाचा उद्देश : –**

१. अस्पृश्यतेचा अर्थ, संकल्पना समजून घेणे. तीचे स्वरूप व ऐतिहासीक पार्श्वभूमी समजून घेणे. तसेच अस्पृश्यतेच्या व्याप्तीची नोंद घेणे.
२. अस्पृश्यतेबाबत भारतीय संविधानात असलेल्या तरतुदी अभ्यासणे.
३. अस्पृश्यता निर्मूलनासंबंधीच्या कायद्यांची माहिती अभ्यासणे.
४. अस्पृश्यता निर्मूलनासंबंधी समाजसुधारकांच्या कार्याचा आढावा घेणे.
५. अस्पृश्यतेच्या वर्तमान परिस्थितीचे अवलोकन व विश्लेषण करणे.

**अध्ययन पद्धती :** – प्रस्तुत शोध निबंधासाठी द्वितीयक स्त्रोतांचा अवलंब करण्यात आला असून या विषयाशी संबंधीत आधार सामग्रीचे संकलन करण्यासाठी विविध पुस्तके, ग्रंथसंपदा, विशेषांक, मासिके, वृत्तपत्रातील प्रकाशीत लेख, संदर्भ साहित्य, इंटरनेटवरील माहिती इत्यादीचा आधार घेऊन प्रस्तुत शोधनिबंध पूर्ण केला आहे.

**अस्पृश्य लोक** – भारतीय हिंदू समाजरचना वर्णव्यवस्थेवर आधारित आहे. त्यात ब्राम्हण, क्षत्रिय, वैश्य आणि शुद्र अशी उतरंड आहे. शुद्राच्या खालोखाल अतिशुद्र ज्यांना अस्पृश्य समजण्यात येते. उपरोक्त वर्ण हे श्रेष्ठ–कनिष्ठतेच्या आधारावर असून अस्पृश्यांचा क्रमांक हा शेवटचा आहे. त्याला पाचवा वर्ण असेही संबोधले जाते. धार्मिक ग्रंथांच्या आधारे आपणास असे दिसून येते की, अस्पृश्य वर्ग हा अन्य वर्गापेक्षा सर्वच अधिकारांनी बेदखल करण्यात आला आहे. त्यांना शिक्षण, मंदिरप्रवेश तसेच सार्वजनिक सोई–सुविधा यापासून वंचित ठेवण्यात आले. त्यांच्यासोबत मोठया प्रमाणात भेदभाव करण्यात आला. तो केवळ सामाजिक भेदभाव नव्हे तर त्याचे स्वरूप मानसीक आणि शारीरिक स्वरूपाचे होते.

मनुस्मृतीच्या काळात अस्पृश्यांवर फार जुलूम केला जात असे. त्यांना गावात राहण्यास मनाई करण्यात आली. त्यांची वस्ती गावाच्या बाहेर असे. त्यांची सावली अपवित्र मानली जाई. त्यांच्याकडून निकृष्ट स्वरूपाची कामे करून घेण्यात येत असे. या काळात त्यांच्यावर फार पराकोटीचा अत्याचार होत होता. अस्पृश्यांच्या उद्धारासाठी अनेक प्रयत्न झाले. ब्रिटीश भारतात, ''भारत सरकारने १९३५ साली अस्पृश्य मानल्या गेलेल्या जातींची यादी तयार केली ज्यांना 'अनुसुचित जाती' असे म्हणतात. त्यात विविध प्रांतानुसार जातींची यादी आहे. त्यात एकूण ४२९ जातींचा समावेश आहे. त्यांची संख्या त्या काळात सुमारे पाच ते सहा कोटी होती.'' (आंबेडकर, २००५, १८–२५), सद्यस्थितीत ''भारतात अनुसुचित जाती ७५१ आहेत'' (Singh, 42) या अनुसुचित जातींची लोकसंख्या २०११ च्या जनगननेनुसार एकून लोकसंख्येच्या १६.६% आहे. जी २०.१४ कोटी इतकी प्रचंड आहे. या जातींचा आजही मोठया प्रमाणात तिरस्कार केल्या जातो. त्यांचा स्पर्श सहन केला जात नाही म्हणून ते अस्पृश्य होत.

**अस्पृश्यता** – वास्तविक पाहता अस्पृश्यतेमध्ये 'विटाळ, भ्रष्टता, बाटणे आणि अशा प्रकारच्या विटाळातून मुक्त होण्याची भावना हीच अस्पृश्यतेमध्ये अंतर्भूत आहे, हे सर्वजन मान्य करतील'' (आंबेडकर, २००५, ९) ही अस्पृश्यता जन्म, संस्कार, स्त्रियांच्या रजस्वला होण्याचा काळ, लग्न, संभोग आणि मृत्यू इत्यादी कारणांमुळे निर्माण होते. अस्पृश्यतेतून / अशुद्धतेतून मुक्त होण्यासाठी शुद्धिकरणाच्या विधीद्वारे ती घालविता येते. त्यामध्ये ''कापड बदलविणे, केस, नखे इत्यादी कापणे, घाम काढणे, आगीत तापविणे, धूर देणे, सुगंधी द्रव्य जाळणे आणि एखाद्या झाडाच्या डहाळीने वार घालणे इत्यादीचा समावेश होत होता.'' (आंबेडकर, २००५, १३) मात्र भारतामध्ये ही अस्पृश्यता एका विशिष्ट समुदायावर थोपविण्यात आली आहे.

**अस्पृश्य मुळचे कोण ?** भारतीय हिंदू समाज हा जातीव्यवस्थेने बनलेला असून अस्पृश्यता ही जातीव्यवस्थेशी निगडीत एक अनिष्ठ सामाजिक प्रथा आहे. यात शुद्ध – अशुद्धतेच्या आधारे विभाजन करण्यात आले असून त्यांच्यासोबत शारिरिक अथवा सामाजिक संबंध ठेवल्या जात नाही. म्हणून ते अस्पृश्य मानल्या गेले. प्रामुख्याने अस्पृश्यतेचे मूळ हे धार्मिक, सामाजिक आणि सांस्कृतिक परंपरा यामध्ये आहे.

अस्पृश्यतेची व्याख्या अनेकांनी केली आहे. साधारणत: असा कोणत्याही प्रकारचा सामाजिक व्यवहार अथवा रितीरिवाज जो एखाद्या व्यक्तिस केवळ त्याच्या जन्माच्या आधारे इतरांसोबत समानपणे वागण्यास प्रतिबंधीत करतो त्यास अस्पृश्यता असे म्हणतात. अस्पृश्यतेची व्याख्या करताना डॉ. शर्मा म्हणतात, ''त्या जाती अस्पृश्य आहेत की, ज्यांच्या एक स्पर्शाने व्यक्ती अपवित्र होतो व परत पवित्र होण्याकरिता तिला काही कृत्ये करावी लागतात.'' (बोबडे, २२९) यात पवित्र–अपवित्रतेला प्राधान्य देण्यात आले आहे.

''रिजले, डॉ. घुर्ये व डॉ. मुजुमदार अस्पृश्यतेच्या उत्पत्ती संबंधी प्रजातीय भिन्नता हा आधार मानतात. रिजले यांच्या मते, भारतात आर्यांचे आक्रमण होण्यापूर्वी अस्पृश्यता अस्तित्वात नव्हती. परंतु आर्य जेव्हा भारतात आले तेव्हा त्यांनी येथील मूळ रहिवाश्यांचा पराजय केला. हे मूळ रहिवासी आर्यापेक्षा सांस्कृतिक व इतर दृष्टींनी मागासलेले होते. पराजित व मागासलेले म्हणून आर्यांनी त्यांना आपल्यापासून वेगळे व अस्पृश्य म्हणून ठेवले.'' (बोबडे, २३४) तर डॉ. बाबासाहेब

e-ISSN No. 2394-8426
Special Issue on Scientific Research July'25
Issue–VII(I), Volume–XIII
https://doi.org/10.69758/GIMRJ/2507S01V13P011

आंबेडकर अस्पृश्यतेच्या उत्पत्तीबाबत नमुद करतात की, ''अस्पृश्य आणि सवर्ण हिंदू यांच्यामध्ये वंशभेद नाही. अस्पृश्यतेचा उदय होण्यापूर्वी हिंदूलोक आणि अस्पृश्य यांच्यातील मूळ भेद टोळयांमध्ये संघटीत असलेले लोक (Tribesmen) आणि बाह्य आक्रमणामुळे पराभूत होऊन वाताहत झालेले लोक (Broken Men) अशा स्वरूपाचा होता. या इतस्तत: विखुरलेल्या जीत लोकांनाच पुढे काळाच्या ओघात अस्पृश्य समजण्यात येऊ लागले. अस्पृश्यतेला जसा वंशभेदाचा आधार नाही. तसाच तिला उद्योगाचाही आधार नाही. अस्पृश्यतेच्या उगमाची दोन कारणे आहेत. अ) ब्राम्हणलोक बौद्धांचा जसा तिरस्कार व द्वेष करित होते तसेच तिरस्कार व द्वेष या जीत लोकांचाही होत होता. ब) इतरांनी गोमांस भक्षणाचा त्याग केल्या नंतरही या जीत लोकांनी गोमांस भक्षण सुरू ठेवले इत्यादी. अस्पृश्यतेच्या उगमाचा शोध घेताना अस्पृश्य आणि चांडाळ या शब्दांची परस्पर गल्लत येणार नाही. याची काळजी घेतली पाहिजे. सर्व सनातनी हिंदू लेखकांनी चांडाळ आणि अस्पृश्य या शब्दांना परस्परांचे पर्याय मानलेले आहेत, असे करणे चूकीचे आहे. अस्पृश्यलोक चांडाळ लोकाहून वेगळे आहेत. चांडाळाचा वर्ग धर्मसूत्राच्या काळामध्ये निर्माण झाला. परंतु अस्पृश्यांचा वर्ग त्यानंतर कितीतरी काळानंतर म्हणजे इ.स. ४०० नंतर निर्माण झाला'' (आंबेडकर, २००५, ४–५) अशा प्रकारचे निष्कर्ष त्यांनी काढले. त्यांच्या मते अस्पृश्यता ही मानवनिर्मित आहे. ती जातीच्या उच्च–निचतेवर आधारित आहे.

हिंदू धर्मातील चौथा वर्ण म्हणजे शुद्र होय या ''शूद्र जातीत अंतर्गत अस्पृश्यता होती. कुणबी, माळी, तेली यांच्यात आपसात खानपान होत नसे. ग्रामीण भागात ब्राम्हण सर्वोच्च आणि त्या खालोखाल ज्या जातीची उपयोगिता जास्त, जिच्याकडे संपत्ती जास्त, ती तुलनेने उच्च अशी स्थिती होती. ती इतर जातीशी खानपानाचे व्यवहार ठेवत नव्हती. अर्थात, प्रत्येक जात अस्पृश्यता पाळत होती असा नसून वरच्या जातींनी आपण अपवित्र होऊ म्हणून अपवित्र जातीशी संबंध ठेवण्याचे बंधन घालून घेतले होते. ज्याप्रमाणे कुणबी इतर जातीकडे खायला जात नसेल तर मराठा त्यांचेकडे जात नसणार, तेली धनगराकडे जेवणार नाही आणि आणखी खाली ही तीव्रता वाढती होती. यातून एक स्पष्ट होते की, अस्पृश्यता पाळणे, शिवाशिव पाळणे हा या ब्राम्हणी धर्माचा भाग झाला होता आणि ही अस्पृश्यतेची चढती, उतरती विभागणी किंवा उतरंड हे तिचे लक्षण होते. उपयोगितेचा सिद्धांत पुढे नेताना असे म्हणता येईल की, ज्या लोकांचा उपयोग कमीत कमी त्या लोकांवर अस्पृश्यतेचा जाच जास्तीत जास्त होता.'' (चौधरी, ३४) यावरून अस्पृश्यता ही शुद्र जातींमध्येही दिसून येते.

**अहिंदू तसेच हिंदूतील अस्पृश्यता :–** अस्पृश्यता ही प्रामुख्याने हिंदू जातीमध्येच नसून अहिंदूमध्येही आढळून येते. मात्र त्याचे स्वरूप विभिन्न आहे. प्राचीन अहिंदू समाजातील अस्पृश्यतेपेक्षा हिंदूतील अस्पृश्यता ही वैशिष्टयपूर्ण दिसून येते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी हिंदू समाजात असलेल्या अस्पृश्यतेचा सखोल अभ्यास केला आणि या पद्धतीची काही प्रमुख लक्षणे ठरविली. त्यात–

१. अपवित्रतेपासून रक्षण करण्यासाठी अहिंदू समाजामध्ये (इतर समाज) जे पृथक्करणाचे नियम सांगीतलेले आहेत ते तर्कसंगत नसले तरी निदान समजून घेण्यासारखे आहेत ते केवळ जन्म, मृत्यू, विवाह इत्यादी विशिष्ट कारणांसाठीच आहेत. परंतु हिंदू समाजामध्ये जे पृथक नेमून दिलेले आहे त्यासाठी कोणतेही कारण नाही, हे उघड आहे.
२. प्रारंभिक समाजामध्ये जी अपवित्रता पाळण्यात येत होती, ती तात्पुरती असून फारच थोड्या कालावधीसाठी असे. ती केवळ खाणे, पिणे इत्यादी प्राकृतिक कार्यकालापर्यंत किंवा जीवनामध्ये निसर्गत: उद्‌भवणाऱ्या जन्म, मृत्यू, मासिक धर्म इत्यादी प्रसंगापुरतीच मर्यादित असे आणि हा अपवित्रतेचा अवधी निघून गेला म्हणजे व शुद्‌धीकरणाचा विधी पार पडला म्हणजे ती अपवित्रता नष्ट होत असे व ती व्यक्ती पुन्हा समाजात वावरण्याजोगी स्पृश्य होत असे. परंतु भारतातील या पाच सहा कोटी लोकांची अस्पृश्यता जन्म, मृत्यू इत्यादींनी उद्‌भवणाऱ्या अस्पृश्यतेपेक्षा पूर्णत: भिन्न असून ती कायम स्वरूपाची आहे. जे हिंदू त्यांना स्पर्श करण्यामुळे बाटतात ते शुद्धिकरण विधी करून शुद्ध होऊ शकतात. परंतु अस्पृश्यांना शुद्ध करूनही ते अपवित्र राहतात, अपवित्र म्हणूनच ते मरतात आणि ते ज्या मुलांना जन्म देतात ते आपल्या कपाळावर अपवित्रतेचा कलंक घेऊनच जन्माला येतात! वंशपरंपरागत कायम स्वरूपाच्या कलंकाची ही बाब असून कोणत्याही उपायाने ते विशुद्ध होऊ शकत नाहीत!

Gurukul International Multidisciplinary Research Journal (GIMRJ)*with* International Impact Factor 8.357
Peer Reviewed Journal
https://doi.org/10.69758/GIMRJ/2507S01V13P011
e-ISSN No. 2394-8426
Special Issue on Scientific Research July'25
Issue–VII(I), Volume–XIII

३. ज्या अहिंदू समाजात अपवित्रतेची कल्पना प्रचलित होती ते तिचा संसर्ग झालेल्या व्यक्तींना वेगळे ठेवीत होते किंवा जास्तीत जास्त त्या व्यक्तींशी घनिष्टपणे संबंधीत असलेल्यांना पृथक ठेवीत होते. परंतु हिंदूतील अस्पृश्यतेमध्ये एक वर्गच अशा लोकाचा की ज्याची आज पाच ते सहा कोटी लोकसंख्या आहे, अंतर्भाव होतो.

४. अहिंदू समाज केवळ दूषित व्यक्तींनाच पृथक करित असत. परंतु त्यांना ते वेगळ्या निवासस्थानात कायमचे विभक्त करून टाकीत नसत. हिंदू समाज अस्पृश्यांच्या कायम विभक्तपणाचा आग्रह धरतो. अस्पृश्यांच्या निवासस्थानी हिदू वास करणार नाही आणि हिंदू लोकांमध्ये प्रचलित असलेल्या अस्पृश्यतेचे हे मूलभूत लक्षण आहे. केवळ सामाजिक बहिष्काराची ही बाब नव्हे किंवा काही काळासाठी तात्पुरता सामाजिक व्यवहार बंद करणे नव्हे. ही प्रादेशिक विभक्तपणाची बाब असून अस्पृश्यांना एका काटेदार परकोट असलेल्या पिंजऱ्यामध्ये बंद करण्यासारखे आहे. प्रत्येक हिंदू खेड्यामध्ये असा एक घेट्टो (पृथक वस्ती) आहे. हिंदू गावात राहतात आणि अस्पृश्य या घेट्टोमध्ये राहतात!'' (आंबेडकर, २००५, २५–२६) अशा प्रकारे अहिंदूची अस्पृश्यता आणि हिंदूची अस्पृश्यता आपणास दिसून येते.

अहिंदू भारतीय समाजात प्रामुख्याने ख्रिश्चन व मुस्लिमांमध्ये अजूनही अस्पृश्य वर्ग आहेत. पण ते हिंदू पेक्षा वेगळी वैशिष्टये ठेवतात. काही अध्ययनाच्या द्वारे असे दिसून आले की, भारतीय ख्रिश्चन समाज हा पूर्वाश्रमीच्या वर्णव्यवस्थेशी संबंध ठेवतो व सामाजिक दृष्टया अस्पृश्य–ख्रिश्चनांना वेगळी वागणूक देतो.

इस्लाम धर्मात अस्पृश्यतेला स्थान नाही. हे तत्वतः सर्वमान्य असले तरी व्यवसाय (घान स्वच्छ करण्याचे काम) व शारीरिक अस्वच्छता (संभोग, लघवीच्या भागास स्पर्श झाल्यास, आदी) या आधारे तात्पुरते अस्वच्छतेचे/अस्पृश्यतेचे पालन होते. धार्मिक किंवा पवित्र स्थानी जाताना शारीरिक अस्वच्छतेचे पालन केल्यास कोणताही भेदभाव होत नाही.

शिख धर्मात धर्मोपदेशक जातीभेद व स्पृश्या–अस्पृश्यता पाळत नाहीत पण प्रत्यक्षात परंपरांना छेद देणे कठीण होत असल्याने जाती आधारावर भेदभाव या समाजात पंजाबच्या काही क्षेत्रात अजूनही आहे. अस्पृश्य शिख समाज 'मजहबी शिख' म्हणून ओळखला जातो. रामदासी व रविदासी हे मुळचे चमार अजूनही शिखांमध्ये सर्वात खालच्या वर्गात येतात.

भारतीय सामाजिक संरचनेच्या अधिरचनेत जातीचे स्थान धर्मापेक्षादेखील वरचे आहे. अर्थात एखादी व्यक्ती धर्म बदलू शकतो, स्वतःचे आडनाव बदलू शकतो, इतकेच काय तर लिंगभाव बदलू शकतो पण जाती बदलू शकत नाही. तसे करणे सोपे नाही.

संस्कृतीकरणाच्या मॉडेल नुसार इतर वरच्या किंवा समानांतर पण आर्थिक संचित ठेवणाऱ्या जातीचे अनुकरण करणे सोपे नाही. व तसे केल्यास त्यासाठी शिक्षा होऊ शकते. असे असतानाही औद्योगीकरण व नागरीकरणाने बाह्यता सार्वजनिक क्षेत्रात जातीय स्पृश्य – अस्पृश्यतेवर बंधने आणली.

**अस्पृश्यता निर्मूलनासाठी झालेले प्रयत्न :** – भारतात स्वातंत्र्यापूर्वी आणि स्वातंत्र्यानंतर अस्पृश्यता निर्मूलनासाठी जे प्रयत्न झाले त्यात अ) गैरसरकारी प्रयत्न आणि ब) सरकारी प्रयत्न अशी विभागणी करता येईल.

**अ) गैरसरकारी प्रयत्न :** – यामध्ये विविध धार्मिक संस्थाद्वारे हिंदू धर्माला कलंक असलेल्या अस्पृश्यता निवारणासाठी ब्राम्हो समाज– १८२८ (राजाराम मोहन रॉय), आर्य समाज  १८७५ (स्वामी दयानंद सरस्वती), प्रार्थना समाज – १८६७ (आत्माराम पांडुरंग), रामकृष्ण मिशन – १८९७ (स्वामी विवेकानंद) ह्या हिंदू धार्मिक संस्थेच्या व्यतिरिक्त विभिन्न धर्मियांनी तसेच पंथीयांनीही प्रत्यक्ष तथा अप्रत्यक्ष स्वरूपात अस्पृश्यता निर्मूलनाकरिता मदत केली त्यामध्ये तथागत गौतम बुद्धांनी बौद्ध धर्माच्या स्थापनेद्वारे अस्पृश्यता व जातीसंस्थेवर जोरदार आघात करण्याचे काम केले. जन्माने कुणी श्रेष्ठ–कनिष्ठ ठरत नसून सर्व समान असतात अशी शिकवण दिली. मुस्लीम संत तसेच इतर संत जसे– संत रविदास, संत कबीर, संत मलुकदास यांनीही जातीप्रथेवर आघात केला. पुढे ख्रिश्चन धर्मप्रसारकांनी धर्माच्या प्रचार–प्रसाराच्या माध्यमातून अस्पृश्यता नष्ट करण्याचा प्रयत्न केला.

अस्पृश्यता निवारण्याच्या कामी विविध सामाजिक संस्थांद्वारे प्रयत्न झाले. त्यात हरिजन सेवक संघ, सत्यशोधक समाज, ईश्वर शरण आश्रम, भारतीय दलित वर्ग संघ, अनुसुचित जाती संघ यासारख्या संस्थांचे कार्य महत्वपूर्ण आहे.

बंगालमध्ये शशिपाद बंडोपाध्याय यांनी अस्पृश्यांकरिता कार्य केले. विठ्ठल रामजी शिंदे यांनी 'दलित वर्ग मिशन' द्वारे महत्वपूर्ण कार्य केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी 'अखिल भारतीय अनुसुचित जाती संघ' (Scheduled Cast Federation) याद्वारे अस्पृश्यता निर्मूलनासाठी तसेच महात्मा जोतीराव फुले यांनी 'सत्यशोधक समाज' या संस्थेद्वारे महत्वपूर्ण असे कार्य केले. महात्मा फुले यांनी तर १८५२ साली सर्वप्रथम अस्पृश्य म्हणून गणल्या गेलेल्या महार– मांगांच्या मुलांकरिता पुण्यात शाळा सुरू केली. आपल्या घरचा पाण्याचा हौद अस्पृश्यांकरिता खुला केला. सत्यशोधक पद्धतीने विवाह लावण्याचे कार्य केले. त्यांच्या नंतर त्यांचा वारसा चालविण्याचे काम कोल्हापूरच्या छत्रपती शाहू महाराजांनी केले. अशा प्रकारे अस्पृश्यता निर्मूलनासाठी गैरसरकारी प्रयत्न झालेले आपणास दिसून येतात.

अस्पृश्यता निवारणाच्या कार्यात वर नोंदविल्याप्रमाणे जसे काही व्यक्ती व संस्थांनी कार्य केले तसेच काही प्रक्रियांनी देखील मोलाचे योगदान दिले. यासंदर्भात औद्योगीकरण, नागरिकरण, संस्कृतीकरण, पाश्चिमात्यीकरण, आधुनिक शिक्षण व्यवस्था, लोकशाहीकरण, आधुनिकता आणि आधुनिकीकरण आदी प्रक्रियांची प्रामुख्याने नोंद घ्यावी लागते.

आधुनिक शिक्षणाने शिक्षणाच्या पुराणमतवादी चौकटींना छेद दिला व स्वातंत्र्य, समता, न्याय, बंधुभाव आणि सर्वांसाठी समानता या तत्वांना पुरस्कृत केले. सवर्णापेक्षा उशिराच हे शिक्षण अस्पृश्यांपर्यंत पोहोचले. पण तरीही लोकांच्या बौद्धिक चौकटी रूंदावण्याचे काम त्याने केले. यातून नविन ज्ञान व व्यवसायांची जी निर्मिती झाली त्याने अस्पृश्यतेच्या प्रश्नाच्या मुळावर आघात केला.

लोकशाहीकरणाच्या प्रक्रियेने व त्यातही निवडणूकांच्या वारंवारतेने व त्यासंबंधीच्या राजकारनाने सामाजिक संबंधात अनेक बदल झालेले आहेत. ज्यात महत्त्वाचे म्हणजे राजकारणासाठी लोकांना जुळवून घेणे महत्त्वाचे असते. कारण बहुमत ही संख्येची गोळा बेरिज असते व त्यासाठी लोकानुनय महत्वाचा ठरतो. वैधानिक अधिकार व या निवडणूकीच्या राजकारणाने अस्पृश्यांना लोकशाही प्रक्रियेत नुसते स्थानच प्राप्त झाले नाही तर त्यांना सामाजिक अधिकारही प्राप्त होतात.

भारतीय संविधान हे आधुनिकतेचे दस्ताऐवज आहे. तर ती स्थिती प्राप्त करण्यासाठी जे जे काही राज्यव्यवस्था समाजात घडवून आणते मग ते सामाजिक संबंधाशी संबंधीत कायदे असोत किंवा रस्त्यांचे जाळे असेल ते सर्व आधुनिकीकरणाच्या प्रक्रियेत येते, अस्पृश्यता निवारणात याने मदत झाली आहे.

**ब) सरकारी प्रयत्न : –**

अस्पृश्यता निर्मूलनासाठी शासकिय स्तरावरसुद्धा अनेक प्रयत्न झाले. स्वातंत्र्यपूर्व काळात इंग्रजांनी अस्पृश्यता निर्मूलनासाठी काही प्रयत्न केल्याचे आपणास दिसून येतात. १८३६ पासून बारडेस व स्टीलसारख्या युरोपीयन लोकांनी विविध प्रांतात लोकांची जातनिहाय मोजणी करून त्यांच्या चालीरितीचा अभ्यास करू लागले. याद्वारे समाजसुधारणाविषयक काही कायदे अस्तित्वात आले. १८७२ च्या विवाह नोंदणी कायद्यामुळे कोणत्याही जातीच्या अथवा धर्माच्या स्त्रि–पुरूषाला विवाहबद्ध होण्याचे स्वातंत्र्य मिळाले. १८५६ मध्ये एका महार मुलास शाळा प्रवेश नाकारल्यावरून खटला भरण्यात आला त्यावर विचारविनिमय होऊन १८५८ साली शासनाने पत्रक काढून केवळ अस्पृश्य म्हणून प्रवेश नाकारल्यास त्या शाळेची मदत बंद करण्यात येईल तसेच सरकारी शाळेत सर्वच जातीच्या मुलांना प्रवेश द्यावा असे स्पष्ट केले. १८७८ मध्ये चॅटफिल्ड या मुंबईच्या शिक्षणाधिकाऱ्याने खालच्या जातीतील मुलांना फीच्या सवलती दिल्या. १९२२ मध्ये मुंबई सरकारच्या अर्थखात्याद्वारे ठराविक जागा खालच्या जातीतून भरण्यात येईल असे धोरण जाहिर केले. १९२५ मध्ये मद्रास सरकारद्वारे कायदा केल्या गेला व त्यानुसार सर्व जातींसाठी धर्मशाळा, विहिरी, रस्ते, तलाव वगैरे सर्व सार्वजनिक ठिकाणी प्रवेश मुक्त केला गेला. १९३० मध्ये अस्पृश्यांची अपात्रता दूर करण्याच्या हेतूने इंग्रज सरकारने कायदेशीर व्यवस्था केली. १९३५ मध्ये अस्पृश्य जातींची सूची तयार केली गेली. याद्वारे काही जातींना सवलती देण्याचा उद्देश होता. १९३६ मध्ये वेगवेगळ्या राज्यात कॉंग्रेसची मंत्रिमंडळे स्थापन झाली. याद्वारे त्यांनी अस्पृश्यांच्या उद्धारासाठी विशेष प्रयत्न केले. मंदिर प्रवेश, कायदा, शिक्षण व आरोग्याकरिता आर्थिक मदत इ. दृष्टीने प्रयत्न केले. अशा प्रकारे इंग्रज सरकारने अस्पृश्यता निर्मूलनासाठीचे महत्त्वपूर्ण कार्य केले. मात्र त्यांना

यात हवे तसे यश आले नाही. मात्र अस्पृश्यता निर्मूलन चळवळीला त्यांनी गती दिली असे आपणास प्रामुख्याने म्हणावेच लागेल.

शासकीच पातळीवर १५ ऑगस्ट १९४७ ला देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर अस्पृश्यता निर्मूलनासाठी अनेक प्रयत्न झाले. सरकारने अस्पृश्यताविरोधी कायदे व संविधानातील तरतुदी आणि अस्पृश्यता निर्मूलनासाठी प्रत्यक्ष प्रयत्न व सक्रिय मदत हे दोन महत्वपूर्ण प्रमुख भाग आहेत.

**संविधानातील तरतुदी** : — भारतीय संविधानात समता आणि न्याय या तत्वाच्या आधारे अस्पृश्यता नष्ट करण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. त्यात पुढील कलमे यादृष्टीने उल्लेखनीय स्वरूपाची आहेत.

अनुच्छेद १५ (१) नुसार राज्य कोणत्याही नागरिकास प्रतिकूल होईल अशा प्रकारे केवळ धर्म, वंश, जात, लिंग, जन्मस्थान यापैकी कोणत्याही कारणावरून भेदभाव करणार नाही. (२) केवळ धर्म, वंश जात, लिंग, जन्मस्थान या किंवा यापैकी कोणत्याही कारणावरून एखाद्या नागरिकाला दुकाने, सार्वजनिक उपहारगृहे, हॉटेल, सार्वजनिक मनोरंजनाची स्थाने यात प्रवेशाबाबत आणि अंशत: व पूर्णत: राज्याचा मदतीवर असलेल्या सर्वसाधारण जनतेकरिता समर्पित केलेल्या विहिरी, तलाव, स्नानगृहे, रस्ते आणि सार्वजनिक ठिकाणे यांचा उपयोग किंवा वापराबाबत कोणतेही निर्बंध अथवा अटी घालता येणार नाही.

अनुच्छेद १६ नुसार राज्याच्या अधिन नोकऱ्या किंवा पदांवर नियुक्तीसंबंधाने सर्व नागरिकांना समान संधी प्रदान केली जाईल. केवळ धर्म, वंश, जात, लिंग, जन्मस्थान आणि निवास अथवा यापैकी कोणत्याही कारणावरून राज्याच्या अधिन नोकरी किंवा पदांकरिता अपात्र ठरविले जाणार नाही अथवा भेदभाव केला जाणार नाही.

अनुच्छेद १७ नुसार अस्पृश्यता नष्ट करण्यात आली आहे. व त्या प्रकारचे कोणतेही आचरण निषिद्ध करण्यात आले आहे. अस्पृश्यतेतून निर्माण होणारी कोणतीही नि:समर्थता लादणे हा कायदयानुसार अपराध आहे.

अनुच्छेद २९ नुसार राज्याच्या निधीवर चालणाऱ्या अथवा राज्याद्वारे मदत मिळणाऱ्या शिक्षण संस्थेमध्ये कोणत्याही नागरिकास केवळ, धर्म, वंश, जात, भाषा यापैकी कोणत्याही आधारावर प्रवेश नाकारला जाणार नाही.

अनुच्छेद ३८ नुसार राज्य अशा प्रकारच्या समाजव्यवस्थेची निर्मिती तसेच संरक्षण करण्याचा प्रयत्न करेल ज्याद्वारे सामाजिक, आर्थिक व राजकिय न्यायाद्वारे लोककल्याण साधेल.

अनुच्छेद ४६ नुसार राज्य हे जनतेतील दूर्बल घटक, आणि खास करून अनुसुचित जाती, अनुसुचित जनजाती यांचे शैक्षणिक तसेच आर्थिक हितसंवर्धनाची विशेष काळजी करेल आणि सामाजिक न्याय तसेच सर्व प्रकारच्या शोषणापासून त्यांचे संरक्षण करेल.

अनुच्छेद १६४ नुसार अनुसूचित जातींच्या कल्याणासाठी तसेच त्यांच्या हिताचे संरक्षणासाठी राज्यात सल्लागार परिषद तसेच स्वतंत्र विभाग स्थापन करण्याची व्यवस्था आहे. या अनुच्छेदान्वये केंद्र सरकारमध्ये एका विशेष अधिकाऱ्याच्या नियुक्तीबाबत व्यवस्था केली आहे.

अनुच्छेद ३३०, ३३२ आणि ३३४ नुसार लोकसभा आणि विधानसभेत राखीव जागा ठेवण्याची विशेष तरतुद आहे.

अनुच्छेद ३३५ नुसार संघराज्य अथवा राज्य सरकारी खात्यातील नोकऱ्या आणि जागा यावर नेमणूक करताना शासकीय कार्यक्षमता लक्षात घेऊन त्यांचे हक्क विचारात घेतले जाईल.

अनुच्छेद ३३८ नुसार अनुसुचित जातीकंरिता 'अनुसुचीत जाती राष्ट्रीय आयोग' स्थापन करण्याची तरतुद आहे. (आंबेडकर, २०२२, ३७—१६१)

**अस्पृश्यता अधिनियम १९५५ (The Untouchability Act – 1955) :—**

याचेच नवे नामकरण 'नागरिक हक्क संरक्षण अधिनियम' असे आहे. भारत सरकारच्या द्वारे अस्पृश्य जाती विरोधात होणाऱ्या सामाजिक भेदभावाला समाप्त करण्यासाठी अस्पृश्यता अधिनियम तयार करण्यात आला आहे. त्यातील काही महत्वपूर्ण कलमे पुढीलप्रमाणे आहेत.

Gurukul International Multidisciplinary Research Journal (GIMRJ)*with* International Impact Factor 8.357
Peer Reviewed Journal
https://doi.org/10.69758/GIMRJ/2507S01V13P011

e-ISSN No. 2394-8426
Special Issue on Scientific Research July'25
Issue–VII(I), Volume–XIII

या कायद्याच्या तिसऱ्या कलमानुसार – प्रत्येक व्यक्तीला कोणत्याही सार्वजनिक पूजास्थानात प्रवेश करण्याचे स्वातंत्र्य, पूजा किंवा इतर धार्मिक संस्कार करण्याचे स्वातंत्र्य, प्रत्येक व्यक्तीला पवित्र नदी, तलाव इ. मध्ये स्नान करण्याचे किंवा पाणी घेण्याचा अधिकार आहे. या नियमाचे पालन न केल्यास सरकारकडून दिली जाणारी मदत बंद केली जाऊ शकते व जमिन काढून घेतली जाऊ शकते.

या कायदाच्या चवथ्या कलमानुसार–प्रत्येकाला सार्वजनिक जलपानगृहे, उपहारगृहे, मनोरंजनाच्या जागात प्रवेश तसेच धर्मशाळा व प्रवासी कक्षातील भांडी व इतर सामान वापरण्याचे स्वातंत्र्य, कोणताही व्यापार, व्यवसाय व उद्योग निवडणे व करण्याचे स्वातंत्र्य, कोणतीही नदी, विहीर, तळे, घाट व स्मशानभूमी वापरण्याचे स्वातंत्र्य. सर्वांकरिता असलेल्या धमार्थ संस्थांचा फायदा व सेवा घेण्याचा अधिकार, गावाच्या कोणत्याही भागात जमीन विकत घेण्याची, घर बांधण्याची व राहण्याची मुभा, कोणत्याही धर्मशाळा किंवा तत्सम संस्थांचा फायदा घेणे, कोणत्याही धार्मिक व सामाजिक प्रथेचा स्विकार करण्याचे स्वातंत्र्य, कोणत्याही प्रकारचे दागीणे किंवा अन्य वापरण्याचे स्वातंत्र्य अंतर्भूत आहे.

या कायद्याच्या पाचव्या कलमानुसार–प्रत्येक व्यक्तीस कोणत्याही सार्वजनिक चिकित्सालय, औषधालय, शिक्षणसंस्था, वसतिगृहे यात प्रवेश घेण्याचा अधिकार व तेथे सर्वांशी सारखे वर्तन करणे. अस्पृश्यतेच्या आधारे कोणताही दुकानदार कोणत्याही व्यक्तीला कोणतीही वस्तू विकण्याचे किंवा कोणतीही सेवा करण्याचे नाकारू शकत नाही.

या कायद्याच्या सातव्या कलमानुसार – या कायद्यातील कोणत्याही नियमांचे उल्लंघन केल्यास व अस्पृश्यतेस प्रोत्साहन देणाऱ्यास सहा महिण्याचा कारावास किंवा पाचशे रूपये दंड किंवा दोन्ही एकत्र अशी शिक्षा होऊ शकते. (बोबडे, २४३–२४४).

या कायद्याबरोबरच सरकार अस्पृश्यता विरोधी कार्य करण्याऱ्या सरकारी व गैरसरकारी संस्था जसे – भारतीय दलित सेवक संघ, भारतीय दलीत वर्ग संघ, हरिजन सेवक संघ या संस्थाचे सहाय्य घेते. याशिवाय त्यांच्या कार्यास गती मिळावी म्हणून त्यांना आर्थिक सहाय्य करते. तसेच अस्पृश्यता निर्मूलन कार्यक्रमावर भर आणि अस्पृश्यतेविरुद्ध जनमत तयार करण्याचे काम करते.

**वर्तमानातील अस्पृश्यतेच्या घटना :–** भारतीय संविधानाने अनुच्छेद १७ नुसार अस्पृश्यता संपविली असली तरी अस्पृश्यतेसंदर्भातील घटना अलिकडेही वारंवार घडत असताना दिसून येतात. अस्पृश्यांचा सामाजिक बहिष्कार, त्यांच्यावरील अनन्वीत अत्याचार, स्त्रीयांवरील बलात्कार, खूण अशा प्रकारच्या घटना देशाच्या कानाकोपऱ्यात घडत असतात. अलिकडेच उत्तर प्रदेशातील हातरस बलात्कार प्रकरण, मंदिरात प्रवेश केला म्हणून उच्चवर्णीयाद्वारे केलेल्या मारहानीतून एका नऊ वर्षीय मुलाचा झालेला मृत्यू , पाण्याच्या हंड्याला स्पर्श केला म्हणून, शिक्षकाने मारहान केल्याने झालेला मृत्यू, महाराष्ट्र तसेच गुजरात मध्ये अस्पृश्य कुटुंबावर केलेला सामाजिक बहिष्कार, अस्पृश्य नवरदेवास घोड्यावर बसल्याच्या कारणाहून झालेली मारहान, अशा अनेक घटना दररोज घडताना दिसून येतात. आजही तेलंगणामध्ये जोगुलांबा गडवाल आणि नागरकुर्नूल या जिल्ह्यात अस्पृश्यांसाठी चहाकरिता वेगळा ग्लास वाापरण्याची पद्धत आहे. अस्पृश्य तसेच आदिवासी सरपंच/सदस्य यांना अपमानीत करण्यात येते. त्यांना खुर्चीवरही बसू दिले जात नाही. असे अनेक ठिकाणी घडलेले दिसून येते. अस्पृश्यांनी मंदिर प्रवेश केल्यास मंदिरास गोमुत्राने शुद्ध केले जाते. उच्च पदावरील अधिकारी/कर्मचारी यांच्यासोबतही भेदभाव केल्याच्या घटना घडून येताना दिसून येतात.

अशा प्रकारे अस्पृश्यता आजही सक्रिय स्वरूपात दिसून येते. ती शहरी असो का ग्रामिण, शिक्षण असो वा व्यवसाय या सर्वच स्तरावर कायम असलेली दिसून येते.

**विविध कल्याणकारी योजना –** अस्पृश्यता निर्मूलन तसेच त्यांच्या कल्याणासाठी सरकारतर्फे त्यांच्यासाठी असलेल्या निरनिराळ्या विशेष योजना राबविण्यासाठी केंद्रात आयुक्त तसेच त्यांच्याखाली दहा सहाय्यक आयुक्त आहे. तसेच एक केंद्रिय सल्लागार मंडळ नेमले आहे.

सरकारी नोकऱ्यात अनुसुचीत जातींकरिता जागा राखीव ठेवण्यात आल्या आहेत. तसेच त्यांना वयोमर्यादेत सुटही देण्यात आली आहे.

त्यांच्या शैक्षणिक विकासासाठी विनामूल्य शिक्षण, शिष्यवृत्या, पुस्तके सरकारतर्फे दिली जातात. तसेच वैदयकीय व तंत्रमहाविद्यालयात विद्यार्थ्यांसाठी राखीव जागा ठेवल्या आहेत.

अस्पृश्यांच्या आर्थिक विकासासाठी त्यांना व्यावसायिक शिक्षणाच्या योजना आहेत. शेती, कुटीरोद्योग व सहकारी संस्था यांच्या विकासासाठी सरकार प्रयत्न करते. त्यांच्या वस्त्या, घरे यांच्या सुधारणेसाठी प्रयत्न केले जातात. गाव विकाससंबंधी कोणत्याही योजना आखतांना त्यांच्या हिताला प्राधान्य दिले जाते.

**निष्कर्ष** : — समाजातील गंभीर समस्या म्हणून अस्पृश्यतेकडे बघावे लागेल. ती मानवतेला एक प्रकारे कलंकच आहे. ती केवळ एका विशिष्ट वर्गाच्या विकासाला प्रभावित करणारी नाही तर संबंध समाजाला प्रभावित करते. म्हणून तीचे निर्मूलन करणे सर्वांसाठी आवश्यक आहे. ते समाजाचे कर्तव्यच आहे.

अस्पृश्यता नष्ट करण्यासाठी शिक्षण, कायदे, समाजजागृती तसेच मूल्यांवर आधारित जीवनशैली याद्वारे प्रयत्न करता येईल. 'सर्व मानव समान आहेत' हा विचार जनमाणसात रूजविल्यास आणि त्याचे आचरण केल्यास समाजात समता, बंधुता प्रस्थापित होऊ शकते. मानवी जिवनाकरिता अस्पृश्यता निर्मूलन आवश्यक आहे. म्हणून यासाठी प्रत्येकानेच स्वत:पासून सुरूवात करावी.

**उपाय योजना** — अस्पृश्यता ही मानवी जीवनासाठी कलंक आहे. त्याचे परिणाम हजारो वर्षापासून काही मानवी समूह भोगत आहे. ती नष्ट करण्यासाठी गेल्या अनेक शतकापासून सतत प्रयत्न होत आहे. स्वातंत्र्यापूर्वी व स्वातंत्र्यानंतर अनेक प्रयत्न झालेले आहेत. मात्र अजूनही संपूर्णपणे तीचे निर्मूलन झालेले नाही. सर्वच स्तरावर त्यासाठी प्रयत्न होणे आवश्यक आहे. त्यासाठी पुढील उपाय करता येईल.

१. शिक्षणाच्या माध्यमातून सर्वांकरिता सारखे व गुणवत्तापूर्ण शिक्षण देऊन सामाजिक समतेची भावना निर्माण करावी.
२. विद्यालयात समाजसुधारकांच्या विचारांची शिकवण द्यावी. ज्यांनी अस्पृश्यता निर्मूलनासाठी कार्य केले.
३. अस्पृश्यता निर्मूलनासाठी असलेल्या भारतीय संविधानातील अनुच्छेद १७ ची काटेकोर अंमलबजावणी करणे आवश्यक आहे.
४. 'अनुसुचित जाती—जमाती अत्याचार प्रतिबंधक कायदा', या कायद्याची कडक अंमलबजावणी करावी.
५. सुरक्षा विभाग जसे पोलीस आणि न्यायव्यवस्थेला अधिक संवेदनशील करावे.
६. अस्पृश्यता निर्मूलनासाठी समाज जागृती आवश्यक आहे. यासाठी प्रचार — प्रसार माध्यमाचा वापर करावा. 'समाज समता संदेश मोहिम' राबवावी. सार्वजनिक स्थळांच्या वापराबाबत समाज जागृती घडवावी.
७. राजकिय क्षेत्रात आजही अस्पृश्यतेचे पालन होताना दिसून येते. त्यामुळे शासनाने कडक पावले उचलावी.
८. शासकिय योजना सर्वांपर्यंत पोहोचेल याची काळजी घ्यावी.
९. धर्मप्रचारकांनी सामाजिक समतेचा संदेश द्यावा. एकत्रित साजऱ्या होणाऱ्या सण — समारंभात सर्वांचा एकत्र समावेश करावा.
१०. आंतरजातीय विवाहामुळे बऱ्याच प्रमाणात अस्पृश्यता निर्मूलनास मदत होते म्हणून असे विवाह करणाऱ्यांना प्रोत्साहन व सुरक्षा द्यावी.
११. अस्पृश्यांचे गलिच्छ व्यवसाय घृणा निर्माण करणारे असल्याने अशा व्यवसायापासून त्यांना मुक्त करावे आणि इतर व्यवसाय करण्यास प्रवृत्त करावे.
१२. अस्पृश्यता निर्मूलन झालेल्या गावांना पारितोषिके प्रदान करावी.
१३. नव्या आधुनिक मूल्यांचा प्रचार — प्रसार करावा ज्याद्वारे मानवी दृष्टीकोण निर्माण होईल.

https://doi.org/10.69758/GIMRJ/2507S01V13P011

१४. शहरातील वसतिगृहात सर्वच जातींच्या विद्यार्थ्यांना प्रवेश द्यावा. ज्यामुळे त्यांच्यात बंधुभाव निर्माण होईल.

१५. अस्पृश्यांची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी शासकिय स्तरावर मोठ्या प्रमाणात प्रयत्न करावे.

अस्पृश्यता निर्मूलन केवळ कायद्याने होणार नाही. त्याकरिता लोकांच्या मानसीकतेत बदल घडवून आणावा लागेल. त्याकरिता शिक्षण, संमेलने, समता, मानवतावादी दृष्टीकोन यांचा वापर करावा लागेल.

**संदर्भ सूची –**


१. आंबेडकर, भिमराव रामजी (२००५), 'अस्पृश्य मूळचे कोण?', नागपूर : रोडगे प्रकाशन

२. आंबेडकर, डॉ. बाबासाहेब (२०२२) 'भारताचे संविधान' नागपूर : युगसाक्षी प्रकाशन

३. बोबडे, डॉ. प्रकाश (२०१०) 'भारतीय समाजरचना पारंपारिक व आधुनिक' नागपूर : श्री मंगेश प्रकाशन

४. चौधरी, नागेश (१९९७) 'जातिव्यवस्था व भारतीय क्रांती' नागपूर : प्रकाशक नागेश चौधरी

५. Singh, K.S. (1992), People of India : Introduction (National Series Valume 1) New Delhi : Oxford University Press.